# नमुंमपा 'etc'अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राची सर्वसाधारण रचना

**नवी मुंबई महानगरपालिका**

↓

**'etc' केंद्र व्यवस्थापन समिती**

↓

**संचालक, 'etc'**

↓

**विशेष तज्ञ कर्मचारी**

वाचा व भाषा तज्ञ
व्यवसाय उपचार तज्ञ
भौतिकोपचार तज्ञ
मानसोपचार तज्ञ
समाज सेवक

**विशेष शिक्षक**

- कर्णबधिर विद्यार्थ्यांकरीता,
- मतिमंद विद्यार्थ्यांकरीता,
- अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांकरीता

संगणक शिक्षक
संगीत शिक्षक
हस्तकला शिक्षक
व्यवसाय शिक्षक
चित्रकला शिक्षक
शारिरीक शिक्षण निदेशक
वर्ग सहायक
नृत्य शिक्षक

**प्रशासकीय कर्मचारी**

वरिष्ठ लिपीक
कनिष्ठ लिपीक
शिपाई
वाहन चालक
काळजी वाहक
बस सहायक
सफाई कामगार

# नमुंमपा 'etc' केंद्रास प्राप्त झालेले प्रमाणपत्र

**National Accreditation Board for Education and Training (NABET)**

**यांच्यामार्फत Certificate of Accreditation**

Accreditation No. WS १२१६०४४, दि. १०/१०/२०१२ (दि. २६/०८/२०१६ पर्यंत वैध्य)

**अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक**

क्र.अकआ/पुर्नवसनकार्य/इटीसी-नवीमुंबई मनपा/नोप्र/१२-१३/३५८४/पुणे, दि. १७/०९/२०१२ (दि. १६/०९/२०१५ पर्यंत वैध्य)

अपंग व्यक्ती तथा विद्यार्थी यांचे व्यवस्थितरित्या संगोपन तथा पुनर्वसन करण्याकरीता कुटूंबातील सदस्य/ पालकांना प्रति माह अंदाजे किमान १० ते १२ हजार रुपये खर्ची करावे लागतात. आपल्या देशातील ९० टक्के पालकांना सदरचा खर्च परवडणे शक्य नाही. त्याचप्रमाणे अपंग व्यक्ती तथा विद्यार्थ्यांचे पुनर्वसन करण्याकरीता विशेष शिक्षणाबरोबरच विविध वैद्यकीय चाचण्या, विविध थेरपी ची आवश्यकता असते. सदरची सुविधा एकाच छताखाली उपलब्ध नसल्याकारणाने पालकांना वेळ, शक्ती व पैसा खर्च होतो परंतु अपंग विद्यार्थ्यांची प्रगती पाहिजे तेवढी होत नाही. याकरीता नवी मुंबई महानगर पालिकेने सन २००७ मध्ये नमुंमपा क्षेत्रामध्ये अपंगत्व असलेले व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये नमुंमपा क्षेत्रामध्ये अपंगत्व असलेल्या व्यक्ती व विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात आढळली. वरील सर्व बाबींचा विचार करता नमुंमपा क्षेत्रातील अपंग व्यक्ती व विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारचे पुनर्वसन व्हावे, पालकांना आर्थिक पाठबळ मिळावे इ बाबींचा विचार करुन अपंगाकरीता सर्व सेवासुविधा एका छताखाली मिळाव्यात ही संकल्पना विचारात घेण्यात आली. अपंग व्यक्ती व विद्यार्थी यांचे जीवनमान उंचावेल व त्यांनी स्वावलंबी होऊन या देशाचा उत्तम नागरीक बनविणे हे उददीष्ट समोर ठेऊन तसेच नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील अपंग व्यक्ती व विद्यार्थी यांचे जीवनमान उंचावेल व त्यांनी स्वावलंबी होऊन या देशाचा उत्तम नागरीक बनविणे हे उद्दिष्ट समोर ठेऊन दिनांक २८ जून २००७ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेने अनिवासी कर्णबधिर शिक्षण प्रशिक्षण केंद्र सुरु केले. हा प्रकल्प यशस्वी झाल्यामुळे इतरही अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे विविध प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची आवश्यकता भासू लागली व समाजामध्ये वाढता प्रतिसादर बघता सन २००८ पासून नवी मुंबई महानगर पालिकेने etcअपंग शिक्षण, प्रशिक्षण व

सेवासुविधा केंद्राची स्थापना केली. सर्व अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी व अपंग व्यक्तींकरीता विविध कल्याणकारी योजना राबविणारी ही देशातील पहिली महानगर पालिका आहे. विशेष शिक्षणाबरोबरच एकात्म शिक्षण, समावेशित शिक्षण, दूरशिक्षण, गृह प्रशिक्षण इ. शिक्षणाचे सर्व पर्याय एका छताखाली उपलब्ध करुन देणारी हे पहिले अपंग शिक्षण व प्रशिक्षण केंद्र ठरले आहे.

सन २००७ मध्ये प्रथम कर्णबधिर शाळा सुरु करण्यात आली. त्यानंतर टप्याटप्याने सन २०१० पर्यंत मतीमंद, अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांकरीता शाळा सुरु केल्या. तसेच बहुअपंगत्व, एकात्म शिक्षण, गृह प्रशिक्षण, वैयक्तीक प्रशिक्षण वर्ग, बाहय रुग्ण विभाग इ. विभाग सुरु करण्यात आले. सद्यस्थितीत ४३० अपंग विद्यार्थ्यांना 'etc'केंद्रामुळे शिक्षण व प्रशिक्षणाचा लाभ झाला आहे. केंद्र ही अपंगाची शाळा नसून ते अपंग विद्यार्थी, त्यांचे पालक, अपंग व्यक्ती, विशेष शिक्षण, सामान्य शिक्षक, विशेष प्रशिक्षणार्थीर्ता इत्यादी करीतांचे प्रशिक्षण केंद्र आहे. अपंग केंद्राचे नाव व लोगो भारत सरकारमार्फत ट्रेड मार्क नोंदणीकरण करुन घेण्यात आलेली आहे. कर्णबधिर मुलांच्या अभ्यासात मौखिक पद्धतीवर विशेष भर दिला जातो. सर्व अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पूर्व प्राथमिक वर्गासाठी 'etc'केंद्राने स्वत:चीच अभ्यासक्रम पद्धती विकसीत केली आहे. ती परिणामरीत्या वापरली जाते. अपंग विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात भाषा विषयक जास्तीत जास्त उतारे, अभिनय गोष्टी, प्रात्यक्षिके यांचा वापर केला जातो. प्राथमिक वर्गासाठी शाळा, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचा अभ्यासक्रम वापरते. येथील शिक्षण प्रशिक्षण पद्धतीत शिक्षक, बालक आणि पालक यांचा समन्वय साधल्याने विद्यार्थ्यांमध्ये चांगला सकारात्मक बदल झालेला पहावयास मिळतो. पाठ निरिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या बरोबर येथे पालकही बसत असल्याने पालकांना आपल्या पाल्याच्या प्रशिक्षणाचे बारकाईने निरिक्षण करता येते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमधील सकारात्मक व नकारात्मक पैलू त्यांच्या लक्षात येतात. विद्यार्थ्यांमध्ये म्हणजेच समुहामध्ये आपले मूल कसे वावरते याचीही त्यांना कल्पना येते. याचा उपयोग त्यांना घरी मूलाच्या प्रशिक्षणामध्ये करता येऊन अपंग विद्यार्थ्यांची प्रगती अधिक जलदगतीने होते. पालकांना शास्त्रशुध्द पध्दतीने प्रशिक्षण मिळाल्यामुळे ते स्वावलंबी होतात.

विशेष शिक्षणाबरोबरच अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्रामध्ये भौतिकोपचार (PT), व्यवसायोपचार (OT), समुपदेशनही केले जाते. याबरोबरच येथील मुलांना संगीत, चित्रकला, हस्तकला, शारिरीक शिक्षण यासारखे विषयही शिकवले जातात. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या राष्ट्रीय सणांबरोबरच येथे भारतीय परंपरेतील विविध सण, उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. केंद्रामध्ये मुलांना गायन, वादन आणि नृत्याचे धडे मिळत असल्याने त्याचाही लाभ विद्यार्थ्यांना खूप चांगला होत आहे. केंद्रामध्ये

शालेय शैक्षणिक सहलींचेही येथे आयोजन केले जाते. याचा फायदा अपंग विद्यार्थ्यांना समुहात वावरताना होतो. सहशालेय उपक्रमांमुळे भाषा मोठया प्रमाणात विकसीत होते. मूलांचा आत्मविश्वास वाढीस लागतो. 'etc'केंद्र विशेष प्रशिक्षण देऊन विशेष विद्यार्थ्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे सर्वसामान्य शाळेमध्ये पाठवते व एकात्म शिक्षणाव्दारे त्यांना विशेष प्रशिक्षणही देत आहे. सन २००८ ते २०१२ या काळात 'etc'केंद्रामधून प्रशिक्षण घेऊन सर्वसाधारणपणे २१५ अपंग विद्यार्थी पूर्णत: तथा अंशत: सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत.

'etc'केंद्राचे Quality Council of India-NABET मार्फत स्कुल ॲक्रीडीटेशनचे प्रक्रिया सन २०१० मध्ये सुरु करण्यात आली असून 'etc'केंद्राचे ॲक्रीडीटेशन होऊन देशातील हे अपंगांकरीताचे पहिले ॲक्रीडीटेटेड केंद्र ठरेले आहे.

## 'etc'अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रातील विभाग

- **कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व प्रशिक्षण विभाग**

  'etc'केंद्रामध्ये ९० कर्णबधिर विद्यार्थ्यांची प्रवेश मर्यादा मंजूर असणाऱ्या या विभागामध्ये कर्णबधिर विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण, वाचा प्रशिक्षण, श्रवण प्रशिक्षण, सहशालेय शिक्षण दिले जाते. कर्णबधिर मूलांना शिक्षण, प्रशिक्षण देऊन त्यांना सर्वसामान्य शाळेत पाठविण्यात येते. सन २००८ ते २०१२ या कालावधीमध्ये २५ कर्णबधिर विद्यार्थी सर्वसामान्य शाळेत पाठविण्यात आले. त्याठिकाणी ते अत्यंत यशस्वी वाटचार करत आहेत.

- **मतिमंद विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व प्रशिक्षण विभाग**

  'etc'केंद्रामध्ये १५० मतिमंद विद्यार्थ्यांची प्रवेश मर्यादा असणाऱ्या या विभागामध्ये ७८ मतिमंद विद्यार्थी शिक्षण, प्रशिक्षण घेत आहेत. विशेष शिक्षणाबरोबर व्यवसाय उपचार, भौतिकोपचार, वाचा शिक्षण इ. शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येते. मतिमंद मुलांनचे हस्तकौशल्य, बौधिक कौशल्य तसेच दैनंदिन जीवनावश्यक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच Educable Group मधील मतिमंद मूलांना इयत्तेप्रमाणे शिक्षणही देण्यात येते. अत्यंत दर्जात्मक व प्रत्येक मूल स्वमग्न मूलांसाठीसुध्दा या विभागांतर्गत स्वतंत्र्यरीत्या शिक्षण देण्यात येते.

- **अध्ययन अक्षमता विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व प्रशिक्षण विभाग**

  नमूंमपा शाळा तथा खाजगी शाळांचे सर्वेक्षण करण्यात येऊन At risk अध्ययन अक्षम मुले आढळणाऱ्या मुलांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते. या विभागामध्ये ९० विशेष अध्ययन अक्षम

मुलांना प्रवेश देण्याची मर्यादा निश्चित करण्यात आलेली असून या विभागामार्फत ७५ विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेपूर्वी किंवा शाळेच्या वेळानंतर २ ½ तास हे १ ड ते २ वर्षे कालावधीकरीता डिसलेक्सीया, डिसकॅलक्युलिया, डिसग्रैफीया या सर्व एक किंवा एकापेक्षा अधिक समस्या असणाऱ्या अध्ययन अक्षम प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण देण्यात येते. एका Batchचा प्रशिक्षणाचा कालावधी संपल्यानंतर पुनश्च सर्वेक्षण करुन नवीन Batchला वरील नमुद कालावधीकरीता पूर्ण प्रशिक्षण देऊन सर्वसामान्य शाळेत पाठविले जाते.

- **अंध विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व प्रशिक्षण विभाग**

  'etc'केंद्रामध्ये ९० अंध विद्यार्थ्यांची प्रवेश मर्यादा असणाऱ्या या विभागामध्ये २१ अंध विद्यार्थी शिक्षण, प्रशिक्षण घेत आहेत. या विभागामध्ये अंध विद्यार्थ्यांना विशेष शिक्षणाव्दारे Addaptive Materail चा वापर करुन सोप्या पद्धतीने अभ्यासक्रमाव्दारे शिक्ज्ञण दिले जाते. उदा. ब्रेल लिपी, ब्रेलर, गणित पाटी, ॲबॅकस) त्याचप्रमाणे Oriantation & Mobility वर भर दिला जातो. अशा प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यांना सर्वसामान्य शाळेत पाठविण्याचे ध्येय साध्य केले जाते.

- **बहू अपंगत्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व प्रशिक्षण विभाग**

  एकापेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना या विभागामार्फत एक शिक्षक व एक विद्यार्थी या प्रमाणात शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.

- **समैकित (एकात्म) शिक्षण विभाग**

  अपंग विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त दर्जात्मक शिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे सर्वात मूत्वाचे आहे. 'etc'केंद्राचे संपूर्ण शिक्षण, प्रशिक्षण हेच ध्येय ठेऊन काम करत आहे. 'etc'केंद्रामधून पुर्वतयारीचे शिक्षण घेऊन इतर कोणत्याही विशेष शाळेमधून सर्वसामान्य शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य शाळांनाही सहायक शिक्षण व प्रशिक्षण समैकीत (एकात्म) शिक्षण विभागामार्फत केले जाते.

- **समावेशित शिक्षण विभाग**

  अपंग शिक्षणाबाबत प्रसार व प्रचार याबाबत आवश्यक तितक्या प्रमाणात जनजागृती होताना दिसून येत नाही. त्यामुळे समाजामध्ये अपंगांचे शिक्षण व समस्याबाबत अनेक समज गैरसमज आढळतात. बऱ्याचवेळा पालकांना विशेष शाळांबद्दल माहिती नसते. किंवा अशा शाळांमध्ये शिक्षण घेणेबाबत न्यूनगंडाची भावना असते किंवा काही वेळा विशेष शाळा उपलब्ध नसतात. अशा अनेक कारणांमुळे अपंग मुलांना त्यांच्या अपंगत्वानुसार आवश्यक शिक्षण न देता त्यांना पालक

सर्वसामान्य शाळेत अपंग मूलांना प्रवेश घेतात. परंतु विशेष प्रशिक्षणाशिवाय अपंग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळेत शिक्षण घेणे अशक्यप्राय होते. अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या शालेय वेळेच्या आधी किंवा नंतर आठवडयातून आवश्यकतेनुसार ३वेळा/ २वेळा/ १वेळा प्रशिक्षण दिले जाते. ज्यामध्ये विशेष शिक्षणाबरोबरच विविध थेरपी सुविधाही पुरविण्यात येतात.

- **गृह प्रशिक्षण विभाग**

अनेकवेळा बहुअपंगत्वामुळे अपंग मुलांना 'etc'केंद्रात येऊन प्रशिक्षण घेऊ शकत नाहीत अशा मुलांना त्यांच्या घरी जाऊन प्रशिक्षण दिले जाते. काहीवेळा अनाथ आश्रमामध्ये अगदी ० वय वर्षे वयोगटापासून विद्यार्थी असतात. सर्वसाधारणपणे ६-७ अपंग मुले हे ४०-५० मुलांची संख्या असणाऱ्या आश्रमामध्ये आढळतात. 'etc'केंद्रामध्ये अपंग मुलांच्या शिक्षणाबरोबर अपंग मुलांच्या पालकांनाही प्रशिक्षण दिले जाते. अशावेळी सर्व मुलांना घेऊन प्रशिक्षणाच्या ठिकाणी जाणे सहजशक्य नसते त्यामुळे etcकेंद्रामार्फत त्यांना गृह प्रशिक्षण विभागांतर्गत शिक्षण, प्रशिक्षण सुविधा पुरविते.

- **पुर्व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र**

स्वावलंबन हे प्रमुख ध्येय असल्यामुळे १४-१८ वयोगटातील अपंग विद्यार्थ्यांकरीता या विभागामार्फत २० ते २५ विविध वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाते तसेच त्या वस्तुंचे प्रदर्शन भरवून विक्री केले जाते. त्याचबरोबर मुलांचा आत्मविश्वास वाढीस लागतो व त्यांच्या सहशालेय शिक्षणाच्या माध्यमातून त्यांची शारिरीक क्षमताही वाढील लागते.

‘etc’अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राचे विभाग

| अ.क्र. | विभागाचे नाव | स्थापना वर्ष | विद्यार्थी संख्या (चालू वर्षापासून) | अपंग संहीत अधिनियम १९९५ प्रमाणे | नमुंमपा ‘etc’केंद्र प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | विद्यार्थी व पद प्रमाण | विद्यार्थी व पद प्रमाण |
| १ | कर्णबधिर विद्यार्थ्यांकरीता विभाग | २००७-०८ | ८६ | ८:१ | १४:१ |
| ४ | मतिमंद विद्यार्थ्यांकरीता विभाग | २००८-०९ | १४५ | ८:१ | १५:१ |
| ५ | समावेशित शिक्षण वर्ग | २००८-०९ | ०२ | --- | ५०:१ |
| ६ | एकात्म शिक्षण व प्रशिक्षण वर्ग | २००८-०९ | २० | --- | २५:१ |
| ७ | बहुअपंगत्व | २००८-०९ | १२ | --- | ५:१ |
| ८ | अध्ययन अक्षमता | २०१०-११ | ८८ | --- | १८:१ |
| ९ | बाहय रुग्ण विभाग | २०१०-११ | १०५ | --- | १०:१ |
| १० | गृह प्रशिक्षण | २०१०-११ | १५ | --- | ३:१ |
| १३ | आऊटरिच | २००८-०९ | १८२० | --- | १५०:१ |
| १४ | अंध विद्यार्थ्यांकरीता विभाग | २०१४-१५ | २७ | १०:१ | १८:१ |

- **etcकेंद्रामार्फत अपंग व्यक्ती व विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेची नावे**

नवी मुंबई महानगर पालिकेचे 'etc'अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रामार्फत विविध योजना राबविण्यात येतात ते खालीलप्रमाणे

| क्र | योजना | सन २००८-०९ | सन २००९-१० | सन २०१०-११ | सन २०११-१२ | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्णबधिरांकरीता Cochlear Implant या शस्त्रक्रियेकरीता आर्थिक सहाय्य | ------ | ०४ (प्रत्येकी ०१ लाख रु.) | ०४ (प्रत्येकी ०१ लाख रु.) | ०३ (प्रत्येकी ०१ लाख रु.) | ०४ (प्रत्येकी ०१ लाख रु.) | ------- |
| २ | अपंगांना वैद्यकीय आर्थिक मदत | ------ | ०२ (प्रत्येकी ५० हजार रु.) | ------ | ------ | ------ | ------ |
| ३ | अपंगांना स्वयंरोजगाराकरीता आर्थिक सहाय्य | ------ | १० (प्रत्येकी ४० हजार रु.) | २० (प्रत्येकी ४० हजार रु.) | २४ (प्रत्येकी ४० हजार रु.) | ०५ (प्रत्येकी ४० हजार रु.) | ०७ (प्रत्येकी ४० हजार रु.) |
| ४ | प्रौढ अपंगांना मासिक आर्थिक सहाय्य | ------ | ------ | ४९ (प्रत्येकी १२ हजार रु.) | ९९ (प्रत्येकी १२ हजार रु.) | १३८ (प्रत्येकी १२ हजार रु.) | १२८ (प्रत्येकी १२ हजार रु.) |
| ५ | अपंगाकरीता इतर योजना | ------ | ------ | ०६ (प्रत्येकी २५ हजार रु.) | ०१ (प्रत्येकी २५ हजार रु.) | ------- | ------- |
| ६ | अपंग विद्यार्थ्यांच्या पालकांकरीता शिक्षण/ प्रशिक्षण घेण्याकरीता आर्थिक सहाय्य | ------ | ------ | २९ (प्रत्येकी ७५ रु. प्रतिदिन) | ४५ (प्रत्येकी ७५ रु. प्रतिदिन) | ५९ (प्रत्येकी १०० रु. प्रतिदिन) | ५१ (प्रत्येकी १०० रु. प्रतिदिन) |
| ७ | अपंगांसाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षण योजना | २१२ (प्रत्येकी रु.५००/-) | १४४ (प्रत्येकी ०१ हजार ते ३५००/-रु. पर्यंत) | १८६ (प्रत्येकी ०२ ते १० हजार रु. पर्यंत) | १६४ (प्रत्येकी ०३ ते २५ हजार रु. पर्यंत) | ६४ (प्रत्येकी ०३ ते २५ हजार रु. पर्यंत) | ५२ (प्रत्येकी ०३ ते ३० हजार रु. पर्यंत) |
| ८ | अपंगांसाठी मोफत चलन वलन, श्रवणयंत्र साहित्य योजना | ४२ (प्रत्येकी २ श्रवणयंत्र) | ३३ (३१ लाभार्थ्यांना प्रत्येकी ०२ श्रवणयंत्र व ०२ लाभार्थ्यांना व्हील चेअर) | ३२ (प्रत्येकी २ श्रवणयंत्र) | ३७ (प्रत्येकी २ श्रवणयंत्र) | ४२ (प्रत्येकी २ श्रवणयंत्र) | ४४ (प्रत्येकी २ श्रवणयंत्र) |
| ९ | विशिष्ट गरजा असणाऱ्या अपंग व्यक्तींकरीता योजना | ------ | ------ | ------ | ------ | ०६ (प्रत्येकी ४० हजार रु.) | ०६ (प्रत्येकी ४० हजार रु.) |
| | **एकूण लाभार्थी** | २५४ | १९३ | ३२६ | ३७३ | ३१८ | २८८ |

- **अपंगत्वाबाबत विविध कार्यशाळा**

  'etc'केंद्रामध्ये कार्यरत असणारे तज्ञ, विशेष शिक्षक, सहशालेय शिक्षक, पालक, अपंग विद्यार्थी यांच्याकरीता विविध विषयांवर केंद्रामध्ये महिन्याच्या १ल्या, २ऱ्या व ५व्या शनिवारी विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते. अपंग विषयावर शहरी, राज्य स्तरावर कार्यशाळेमध्ये उपस्थित राहून त्यांचा अभ्यास करुन केंद्रातील विशेष शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी यांना सादरीकरणाव्दारे माहिती देणे. तसेच देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यशाळांमध्ये या केंद्रातील कर्मचारी उपस्थित राहण्यास प्रोत्साहित करण्यात येते.

- **अपंगत्वाबाबत जनजागृती करणे**

  नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रामध्ये वास्तव्य करणारे अपंग विद्यार्थी व व्यक्तींचा स्विकार करुन त्यांचे सामाजिक पुनर्वसन व विकास करण्याकरीता नमुंमपा क्षेत्रातील सामान्य लोकांमध्ये जनजागृती, अपंगत्व प्रतिबंधनात्मक उपाय करण्याकरीता तसेच शिक्षणासंबधी होल्डींग लावणे, पथनाटय सादर करणे, पॅम्प्लेट्स वितरण करणे, विशेष दिनाचे औचित्य साधून कार्यक्रम आयोजित करणे, पदयात्रा काढणे इ. कार्यक्रम आयोजित करुन अपंगत्वाबाबत नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील सर्व सामान्य लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच अपंग व्यक्ती तथा विद्यार्थ्यांकरीता या केंद्रामार्फत त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता विविध योजना राबविण्यात येत असतात.

- **नमुंमपा क्षेत्रातील नमुंमपाच्या शाळेमध्ये MMR लसीकरण करणे.**

  समाजातील अपंगत्वाचे प्रमाण कमी व्हावे व कालांतराने अपंगत्वाचे समूळ नष्ट व्हावे या हेतूने नमुंमपाच्या केंद्राव्दारे MMR (रुबेला) लसीकरण हे नमुंमपाच्या शाळेमधील इयत्ता ०७ ते १०वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्याचे कार्य करण्यात आले आहे. सद्यस्थितीमध्ये १९१ विद्यार्थ्यांना याचे लसीकरण करण्यात आले आहे.

- **One Stop Resource Center**

  'etc'केंद्रामार्फत समाजातील अपंगत्वाचे निर्मुलन व्हावे, अपंगत्वाचे प्रमाण कमी व्हावे याकरीता जनजागृती केली जाते. नमुंमपा क्षेत्रामधील वास्तव्य करणाऱ्या विविध अपंग संवर्गातील व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात येते. अपंगत्वाचे चाचणी व निदान केले जाते. विशेष विद्यार्थ्यांना शिक्षण, प्रशिक्षण व थेरपी मोफत उपलब्ध करुन दिली जाते. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेप्रमाणे अभ्यासक्रम तयार करण्यात येतो. मुलांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवून देण्याबाबत मदत केली जाते. अपंग व्यक्ती तथा विद्यार्थ्यांचे भावनिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक पुनर्वसनाकरीता केंद्र कार्यरत आहे. त्यामुळे हे 'etc'केंद्र One Stop Resource Center म्हणून आपले कार्य पार पाडीत आहे.

- **'etc' केंद्रातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा.**

१. संपूर्णत: मोफत शिक्षण व प्रशिक्षण

२. मोफत अपंगत्वाचे निदान व उपचार

३. मोफत शैक्षणिक साहित्य (प्रत्येक विषयाच्या आवश्यकतेप्रमाणे डिझाईन केलेल्या ए ४ आकारातील वहया, पाठयपुस्तके, नोंदवही अभ्यासपुस्तिका, ओळखपत्र, स्कुल बॅग इ.)

४. मोफत गणवेश (शालेय गणवेश, क्रिडा गणवेश, शूज, बेल्ट, सॉक्स, रेनकोट इ.)

५. दारापर्यंत मोफत बससुविधा

६. सर्वांगीण शारिरीक विकासाकरीता सकस आहार

७. वर्षातून दोनवेळा वैदयकिय तपासणी. (शारिरिक व अपंगत्वानुसार) व आवश्यक लसिकरण.

८. समुपदेशन व मार्गदर्शन

९. पालक प्रशिक्षण

१०. सर्वसामान्य शाळेतील शिक्षकांकरीता विशेष प्रशिक्षण

११. विविध अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता प्रशिक्षण देणारे विशेष प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण

१२. मुलांकरीता Toy Library, शिक्षक व विद्यार्थ्यांकरीता ग्रंथालय, शैक्षणिक साहित्याचे ग्रंथालय

- **'etc' अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राची ठळक वेशिष्टये.**

१. वय वर्ष ० पासून प्रवेश उपलब्ध

२. मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यमामध्ये प्रशिक्षण उपलब्ध

३. केंद्रातील अथवा केंद्राबाहेरील एकात्म शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सपोर्ट सिस्टिम.

४. १०० % विशेष प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची भरती

५. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवश्यकतेनुसार स्वतंत्र अभ्यासक्रमाचे नियोजन व स्वतंत्र्य मुल्यांकन प्रणाली

६. भाषा प्रशिक्षण, श्रवण प्रशिक्षण, वाचा प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण, योग प्रशिक्षण, नृत्य प्रशिक्षण, भौतिकोपचार व व्यवसाय उपचार विषयक प्रशिक्षण इत्यादी सुविधा तज्ञ मार्गदर्शकांदवारे केंद्रातील विद्यार्थ्यांबरोबरच बाहेरील अपंग मुले व व्यक्तींकरिता उपलब्ध.

७. अपंग विद्यार्थी, व्यक्ती व पालकांकरीता समुपदेशन, मानसोपचार सेवा उपलब्ध.

८. शिक्षक, पालक, विदयार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शनपर शिबिर, कार्यशाळांचे आयोजन, शाळेतील थेरपिस्ट, शिक्षकांनाही व्याख्यानासाठी तज्ञ म्हणून उपस्थित राहणेस प्रोत्साहन.

९. अत्यंत सुनियोजित व आधुनिक वर्गरचना, विशेष विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आवश्यकतेप्रमाणे तयार करण्यात आलेले फर्निचर.

१०. पालक - बालक प्रशिक्षण वर्ग, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र.

११. प्रत्यक्ष ज्ञान व अनुभवांकरिता विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध शैक्षणिक भेटींचे आयोजन.

१२. मुलांच्या कौशल्यांना वाव मिळण्यासाठी व व्यावहारिक भाषा ज्ञात होण्यासाठी मासिक स्पर्धा, सण-समारंभ, विशेषदिन इत्यादी आयोजन.

१३. शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे बी.एड., एम.एड. तसेच कर्णबधिर, मतिमंद व सर्व सामान्य मुलांना शिकविणारे प्रशिक्षणार्थीना 'etc'केंद्रामध्ये प्रशिक्षण, वर्ग निरीक्षण सुविधा उपलब्ध.

१४. केंद्रातील काळजीवाहक व वर्गसहाय्यक ही पदे अपंग व्यक्ती किंवा त्यांचे पालक यांच्यासाठी राखीव

१५. सर्वसामान्य शाळेतील शिक्षकांसाठी टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण वर्ग चालविणे.

## 'etc'अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राच्या उल्लेखनिय कामगिरीबाबत.

- **'etc'केंद्रास पंतप्रधान पुरस्कार**

  मा. पंतप्रधान, भारत सरकार यांच्यामार्फत सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये पंतप्रधान पुरस्कार देण्याकरीता विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्थेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्याकरीता भारत सरकारमार्फत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार 'etc'केंद्राने विहीत नमुन्यात अर्ज सादर करुन सन २००९-१० मधील Excellence of Public Administration या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दि. २१ एप्रिल २०११ रोजी नवी दिल्ली येथे मा. पंतप्रधान यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार देण्यात आला.

- **Quality Council of India, New Delhi मार्फत स्कुल ॲक्रीडीटेशन सर्टीफिकेट**

  'etc'अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रातील कामकाज व्यवस्थितरित्या होण्यास, अधिकारी/ कर्मचारी यांना कामाची योग्य शिस्त लागण्याकरीता Quality Council of India, New Delhi मार्फत केंद्राचे स्कुल ॲक्रीडीटेशनबाबत कार्य सुरु होते. सदरचे कार्य पूर्ण करण्यात आले असून Quality Council of India, New Delhi मार्फत या केंद्रास चअछ श्रेणी या वर्गाचा दर्जा देण्यात आलेला आहे.

- **केंद्रातील अपंग विद्यार्थ्यांचा शालेय, आंतरशालेय व राज्यस्तरावर विविध स्पर्धेमध्ये उज्वल यश**

  'etc'केंद्रामधील विविध विभागातील विशेष विद्यार्थ्यांनी शालेय, आंतरशालेय व राज्यस्तरावरील विविध स्पर्धेमध्ये भाग घेतला. उदा. भजन महोत्सव (स्पर्धा), नृत्य स्पर्धा, ॲथलेटीक स्पर्धा, ऑलिंपीक स्पर्धा, चित्रकला, हस्तकला या स्पर्धेमध्ये विशेष विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन 'etc'केंद्रास बक्षिस मिळवून देण्यात आले आहे.

- **सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंगांकरीत मॉडयूल स्कूल तयार करणे**

सर्व शिक्षा अभियान, महाराष्ट्र शासनामार्फत अपंगांकरीता महाराष्ट्र राज्याचे पहिले मॉडयूल स्कूल तयार करण्याची जबाबदारी नवी मुंबई महानगर पालिकेवर देण्यात आली होती. 'etc'केंद्राचे दर्जात्मक कामगिरी लक्षात घेऊन नमुंमपा मा. आयुक्त सो यांच्याकडून 'etc'केंद्रास जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानुसार अपंगांकरीता आदर्श ठरेल असे केंद्राने मॉडयूल स्कूल तयार करण्यात येऊन मा. आयुक्त सो यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५/१२/२०११ रोजी मॉडयूल स्कूलचे उद्घाटन करण्यात आले. याचे महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण अंदाजे ४२ ठिकाणी सदरील प्रकल्पाच्या पुर्नावृत्तीचे कार्य सुरु करण्यात आलेले आहे.

- **'etc'केंद्राचे पुर्नावृत्ती प्रकल्प म्हणून विचार**

  'etc'केंद्रासारखा प्रकल्प महाराष्ट्र व इतर राज्यांमध्ये सुरु करण्याकरीता बिहार, गोवा पॉंडेचेरी, केरला, दिल्ली इ. राज्यांमध्ये 'etc'संचालक यांना मान्यवर प्रशासकीय अधिकाऱ्यांकरीता 'etc'केंद्राचे सादरीकरण करण्याकरीता निमंत्रीत करण्यात आले. तसेच अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत सदरील प्रकल्प विविध नगरपालिका, महानगरपालिकामध्ये सुरु करण्याचे विचाराधीन आहे.

- **Administrative Staff College of India, Hyderabad या संस्थेकडून केंद्राची दखल**

  अपंग क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल **ASCI,** हैद्राबाद या संस्थेने 'etc'अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राची काम करण्याची पध्दत या विषयाचा अंतर्भाव करण्याकरीता तसेच सदरचे केंद्राचा प्रसार देश व परदेशामध्ये करणे हेतू **ASCI,** हैद्राबाद या संस्थेने 'etc'केंद्राचे Case Study चे काम पूर्ण करण्यात आले आहे.